**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. /५२/२०२४**

सगुबाई रंगराव चेचर वगैरे १ वि. इंदूबाई रंगराव पाटील वगैरे १

**नि.नं. १०/लगत / सी**

**<u>उलटतपास वि. प तर्फे वकील श्री. एस.एम. रायबागकर यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरु,</u>**

११. उप अधीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा यांनी पाठविलेल्या नोटीसीनंतर त्याबाबतची मोजणी फी मी भरली किंवा कसे हे मला आठवत नाही. सदर नोटिसीनुसार भुमि अभिलेख पन्हाळा या कार्यालयात तीन महिन्यांचे सातबारा उतारा, नकाशे व अभिलेख हे हजर केले होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मला वाटप दाव्यामध्ये झालेल्या निकालानुसार अजून वाटप होवून मिळालेले नाही. मी दाखल केलेल्या प्रकरणामध्ये अर्जात काय मजकूर नमूद केलेला आहे तो मला समजून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मी वाटप तक्ता व नकाशा हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८.०३.२०२३ रोजी झालेल्या हुकूमनाम्यामध्ये २/३ हिस्सा म्हणजेच ५७.३४ गुंठे असे क्षेत्र नमूद नाही म्हणून ते क्षेत्र माझ्या हिश्यामध्ये नमूद करण्यात यावे याकरिता मी हा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०३.२०२३ रोजी झालेल्या हुकूमनाम्यामध्ये २/३ हिस्सा म्हणजेच ५७.३४ गुंठे हा मजकूर माझ्या मूळ निकालामध्ये व हुकूमनाम्यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर हा माझ्या मूळ निकालामध्ये व हुकूमनाम्यामध्ये नमूद नसल्यामुळे मी केलेली मागणी चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर न्यायनिर्णयामध्ये मी वादी यांना १/३ हिस्सा व प्रतिवादी यांना सामाईकरित्या १/३ हिस्सा असे नमूद करण्यात आलेला आहे असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन करत असलेला हिस्सा हा न्यायनिर्णय तसेच हुकूमनाम्यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या अर्जातील परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जातील परिच्छेद क्र. ६ मध्ये नमूद केल्यानुसार वादींना २/३ व प्रतिवादींना १/३ असे नमूद करणे आवश्यक होते असा मजकूर नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जामध्ये माझी अर्जित मागणी तशी आहे.मी दाखल केलेल्या

प्रस्तुत अर्जामुळे मूळ असलेल्या क्षेत्रामध्ये फरक होणार आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, भुमि अभिलेख पन्हाळा यांचेकडून नोटीस प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत मूळ प्रकरणातील न्यायनिर्णयाची सहीसूद नक्कल मी ताब्यात घेतली व प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. (साक्षीदारास नि. १८/१ वरील नोटीस दाखविण्यात आली.) हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीशीवर तारीख दि. ०९.०८.२०२४ अशी नमूद करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.०८.२०२४ ची नोटीस मला प्राप्त झाल्यानंतर मी न्यायनिर्णयाची प्रत ताब्यात घेतल्याचे मी खोटे व चुकीचे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्जात मी केलेली मागणी ही चुकीची व बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या अर्जामुळे मूळ असलेल्या मिळकतीच्या क्षेत्रात फरक होणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, मूळ दावा मधील न्यायनिर्णय मधील अंतिम आदेशमधील परिच्छेद क्र. २ मधील मजकूर माझ्या अर्जात नमूद नाही. मूळ न्यायनिर्णयमध्ये प्रतिवादी क्र. १ यांना १/३ हिस्सा देण्यात आला आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मूळ प्रकरणातील निकाल मी माझ्या वकिलांकडून वाचून घेतलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, निकालामधील मजकूर मला माझ्या वकिलांनी सांगितला होता. साक्षीदार स्वतःहून सांगते की, सदर न्यायनिर्णयानुसार तिघींना समान तीन हिस्से पडले असे सांगितले होते. मला माझ्या वकिलांनी तीन समान हिस्से मिळालेले नाहीत असे सांगितलेले होते. मी माझ्या अर्जाच्या पृष्ठर्थ साक्षीकरिता माझ्या वकिलांना साक्षीकरिता बोलवणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या झालेल्या निकालामध्ये दुरुस्ती होते आवश्यक आहे त्यामुळे अर्ज दाखल करावा लागेल असे सांगितलेले होते त्यामुळे मी प्रस्तुत प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जबाबातील मजकूर माझ्या वकिलांनी मला सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात माझ्या वकिलांच्या सांगण्यानुसार सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासातील मजकूर काय नमूद करण्यात यावा हे माझ्या वकिलांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मूळ दावा क्र. १५५/२०१४ या हुकुमनाम्यामध्ये कोणतीही तांत्रिक अथवा लिखीत चूक झालेली नसताना सदरचा खोटा अर्ज मी दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, हुकुमनाम्यामध्ये वादी यांना २/३ व प्रतिवादी यांना १/३ हिस्सा नमूद करण्यात यावा अशी माझी मागणी खोटी व चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले प्रकरण चुकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. १, २ अ

आणि २ ब यांनी दाखल केलेले म्हणणे माझ्या वकिलांनी मला वाचून दाखविले होते. सदरचे म्हणणे काय वाचून दाखविले होते ते मला आता आठवत नाही. सदरचे म्हणणे मला वकिलांनी केव्हा वाचून दाखविले होते ते मला आठवत नाही. प्रतिवादी यांना सामाईकरित्या १/३ असा मजकूर सामनेवाला यांनी दाखल केलेल्या म्हणण्यात नमूद केलेला आहे हे माझ्या वकिलांनी मला सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. मी दाखल केलेल्या अर्जाबाबत केलेली मागणी कायद्याने करता येणार नाही असे सामनेवाला यांचे म्हणणे आहे किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथापि त्या संबंधी जबाबामध्ये खोटया आशयाचे म्हणणे दिले आहे असा मजकूर नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खोटे शपथपत्र दाखल करून खोटी कागदपत्रे मी हजर केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०३.२०२३ पारीत झालेल्या हुकुमनाम्यामध्ये कोणताही तांत्रिक अथवा लिखीत दोष नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

दि. ०९/१२/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा